101

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** सातारा **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0055 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/02/2020 20:18 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 29/02/2020
**Date To ( दिनांक पर्यंत):** 29/02/2020
**Time From (वेळेपासून):** 14:05 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:05 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/02/2020 **Time (वेळ):** 19:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 014 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/02/2020 20:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 0.1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पोलीस स्टेशन सातारा समोर,हटेल विजय ,औरंगाबाद

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** कैलास संताराम मगर

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | केकत जळगाव,पैठण औरंगाबाद,पैठण,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | केकत जळगाव,पैठण औरंगाबाद,पैठण,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7720930835

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुभाष छगनराव भोसले | | | 1. प्लट क्र, पाटील दवाखान्याच्या पाठीमागे,मयुरपार्करोड, हर्सुल परीसर, औरंगाबाद,सातारा,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक: 29/02/2020.मी, कैलास संताराम मगर, वय-29 वर्षे, व्यवसाय- खाजगी चालक, रा: केकत जळगाव, ता.पैठण जि. औरंगाबाद मो.7720930835.समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, मी दिनांक 27/02/2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद येथे मला होत असलेल्या लाचमागणी बाबतची तक्रार दिली होती, ती पुढील प्रमाणे आहे. मी वरील ठिकाणचा राहणारा असुन खाजगी ट्रक वर चालक आहे. मी माझा मित्र नामे रवि जयवंतराव पगारे रा: हर्सुल औरंगाबाद असे दिनांक 22/02/2020 रोजी संध्याकाळी माझे काम संपल्यानंतर बिडबायपास औरंगाबाद रोडवरील हटेल खालसा पंजाबी येथे जेवण करण्यासाठी गेलो होतो, त्यावेळी तेथे साध्या वेशातील पोलीसांनी रेड टाकली त्यावेळी मला व माझा मित्र रवि पगारे आणी हटेलमध्ये आणखी इतर 7 ते 8 जणांना आणी हटेल मालकाला त्या पोलीसांनी मिलकर्नर येथील सि.पी ऑफीसला घेवुन आले. तेथे आणल्यावर त्यांनी आमचे नाव गाव लिहुन घेतल्यानंतर आमचे घाटी दवाखान्यात मेडीकल करुन आणले, त्यानंतर आम्हा सार्वानं◌ा त्यांनी पोलीस स्टेशन सातारा औरंगाबाद शहर येथे घेवुन गेले व सातारा पोलीसांच्या ताब्यात दिले. सातारा पोलीस स्टेशन मध्ये आम्हा सार्वावर त्यांनी गुन्हा दाखल केला व हटेल मालकाला व बाकीचे 7 ते 8 जणांना पोलीसांनी सोडुन देवुन आम्हाला दोघांना रात्रभर पोलीस ठाण्यात बाहेर बसुन ठेवले. त्यांनतर रात्रीचे दोन वाजता आम्हाला पोलीस ठाण्यातले पोलीस हवालदार भोसले साहेबांनी बोलावुन घेतले व आमच्याकडील मोबाईल जप्त करुन घेतले आणी सहा हजार रुपये घेवुन या नंतर तुम्हाला जामीन देवुन तुमचे मोबाईल परत देतो असे सांगीतले व आम्हाला दोघांना दुस-या दिवशी सकाळी सोडुन दिले त्यावेळी भोसले साहेबांनी यांनी एका चिठ्ठीवर त्यांचा मोबाईल नंबर लिहुन दिला होता व सांगीतले की, उदया मला हया नंबरवर फोन कर मग मी फोनवर तुला सांगतो ते काय करायचे.त्यांनतर दुस-या दिवशी सकाळी दि.23/02/2020 रोजी माझा मित्र रवि पगारे याचे मित्राच्या फोनवरुन रवि पगारे यांचे आईन भोसले साहेबांना फोन केला त्यावेळी भोसले साहेबांनी सांगीतले की, रवि व त्याचा मित्र कैलास मगर असे दोघांवर गुन्हा नोंद झाला आहे तर दोघे जण मिळुन सहा हजार रुपये घेवुन पोलीस स्टेशनला या तुमची जामीन करुन देवुन रविचा मोबाईल परत घेवुन जा त्यावर माझा मित्र रवि पगारे यांची आई पोलीस हवालदार श्री.भोसले साहेबं◌ाना फोनवर बोलली की, आम्ही हातावरचे लोक आहेत आमच्याकडे एवढे पैसै नाही त्यावर भोसले साहेब म्हणाले की, पैसे दिल्याशिवाय तुमची जामीन होणार नाही व मोबाईल सुद्धा परत मिळणार नाही असे म्हणुन फोन कट केला. त्यानंतर आज दिनांक 27/02/2020 रोजी रवि पगारे यांचे मोबाईल वर भोसले साहेबांनी फोन करुन सांगीतले की, आज संध्याकाळी पाच वाजेदरम्यान तु व कैलास पोलीस स्टेशना सहा हजार रुपये घेवुन या तुम्हाला जामीन देवुन तुमचे मोबाईल देवुन टाकतो त्यावर रवि पगारे त्यांना नाईलाजास्तव हो म्हणाला आहे. परंतु आम्हाला भोसले साहेबं◌ानापैसे देण्याची ईच्छा नाही तरी त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी ही विंनती अशी तक्रार नोंदविली. माझे वरील तक्रारीवरुन औरंगाबाद ऍ◌न्टी करप्शन ब्युरो, येथील पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडीत यांनी लाचेच्या

मागणी ची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला.त्याप्रमाणे दिनांक 27/02/2020 रोजी पोलीस हवालदार श्री.भोसले यांनी बोलवल्याप्रमाणे अल्पाईन हस्पीटल, एम.आय.टी कलेज समोर, बिडबाय पास रोड, औरंगाबाद येथे समक्ष जावुन पोलीस हवालदार श्री.भोसले यांच्या लाचेच्या मागणीची पडताळणी पंच क्र. 1 श्री.नवनाथ मतसागर यांचे समक्ष व्हाईस रेकर्डरच्या सहाय्याने करण्यात आली. पडताळणीचे वेळी पोलीस हवालदार श्री.भोसले यांनी मला मी माझा मित्र रवि पगारे विरुद्ध पोलीस स्टेशन सातारा येथे दाखल गुन्हयात कोर्टात हजर न करता पोलीस स्टेशनला जामीन देवुन जप्त केलेले मोबाईल परत देण्यासाठी माझे कडे तडजोडी अंती चार हजार रुपये लाचेची मागणी करुन लाचेची तात्काळ पोलीस स्टेशन सातारा येथे घेवून येण्यास सांगितली. त्यावरुन पोलीस हवालदार श्री.भोसले यांना लाच म्हणून देण्या करीता मी हजर केलेल्या चार हजार रुपये त्यात 2000/- रु. दराची 01 नोट व 500/- रुपये दराच्या 04 नोटांना ऍन्थ्रसीन पावडर लावून माझे पन्टचे समोरील उजव्या खिशात ठेवण्यात आल्या. माझे कडे व्हईस रेकर्डर देवून मला व पंच क्र.1 श्री.मतसागर व माझा मित्र रवि पगारे यांना पोलीस हवालदार श्री.भोसले यांचे भेटी करीता रवाना केले व पोलीस स्टेशन सातारा येथे सापळा आयोजित करण्यात आला. त्यावेळी पोलीस हवालदार श्री.भोसले हे पोलीस स्टेशनला हजर नव्हते त्यावेळी मी त्यांना माझ्या मोबाईल वरुन फोन केला परंतु त्यांचा फोन बंद होता त्यावेळी मी पोलीस स्टेशन च्या इतर लोकांना त्यांचेबाबत विचारणा केली असता त्यांनी माहीती नसल्याचे सांगीतले. त्यानंतर मी पोलीस उप अधिक्षक श्री.पंडीत सुचनेप्रमाणे सुरक्षीत ठिकाणी परत आलो त्यावेळी माझ्याकडील व्हाईस रेकर्डर बंद केल्यानंतर मी दिनांक 27/02/2020 रोजी सुमारे नउ वाजेच्या सुमारास परत पोलीस हवालदार श्री.भोसले यांना फोन केल तेंव्हा त्यांनी मला लाच रक्कम घेवुन उदया दिनांक 28/02/2020 रोजी बोलविले आहे. त्यांनतर पोलीस उप अधिक्षक श्री.पंडीत यांनी मला व माझा मित्र रवि पगारे यांना उदया दि.28/02/2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय औरंगाबाद येथे हजर राहण्याच्या सुचना देवुन माझ्याकडील लाच रक्कम 4,000/-रुपये ताब्यात घेतले व आम्हाला घरी जाण्याची परवानगी दिली.त्यानंतर मी व माझा मित्र रवि पगारे हे सुचने प्रमाणे दि.28/02/2020 रोजी अ.सी.बी कार्यालयात हजर आल्यानंतर माझा मित्र रवि पगारे याने पोलीस हवालदार श्री. भोसले यांना फोन लावुन पोलीस स्टेशनला कधी यायचे असे विचारले असता पोलीस हवालदार श्री. भोसले यांनी आम्हाला पैसे व कागदपत्र घेवुन चार पाच वाजता बोलाविले आहे. त्यावरुन पोलीस हवालदार श्री.भोसले यांना लाच म्हणून देण्या करीता पोलीस उप अधिक्षक श्री. पंडीत यांनी माझ्याकडुन ताब्यात घेतलेल्या नोटा माझे पन्टचे समोरील उजव्या खिशात ठेवण्यात आल्या. माझे कडे व्हईस रेकर्डर देवून मला व पंच क्र.1 श्री.मतसागर व माझा मित्र रवि पगारे यांना पोलीस हवालदार श्री.भोसले यांचे भेटी करीता रवाना केले व पोलीस स्टेशन सातारा येथे सापळा आयोजित करण्यात आला.त्यावेळी पोलीस हवालदार श्री.भोसले यांनी मला सांगीतले की, रवि पगारे यांचे कागदपत्रे तुम्ही आणली नाही ती कागदपत्रे व लाच रक्कम 4000/- रुपये ही उदया दिनाक 29/02/2020 रोजी श्री.मतसागर यांचे पाठवुन दया व तुम्ही दोघे परत येण्याची गरज नाही असे सांगुन निघुन गेले. त्यानंतर आम्ही परत आल्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.पंडीत यांनी माझ्याकडील शासकीय व्हाईस रेकर्डर ताब्यात घेवुन बंद केला व माझ्याकडील लाच रक्कम ताब्यात घेवुन आम्हाला परत दि.29/02/2020 रोजी अ.सी.बी कार्यालयात हजर राहण्याची सुचना देवुन आम्हाला घरी जाण्याची परवानगी दिली.सुचनेप्रमाणे आम्ही आज दिनांक 29/02/2020 रोजी अ.सी.बी कार्यालयात हजर आलो तेंव्हा पोलीस हवालदार श्री.भोसले यांनी पंच क्र.01 श्री.मतसागर यांना लाच रक्कम 4000/-रुपये घेवुन बोलविल्या वरुन पोलीस उप अधिक्षक श्री.पंडीत यांचे ताब्यातील लाच रक्कम 4,000/-रुपये ही पंच क्र.1श्री.मतसागर यांचे पन्टचे उजव्या खिशात अलगद ठेवुन दिल्या. व पंच क्र.श्री.मतसागर व पंच क्र.02 श्री.राठोड यांना पोलीस हवालदार श्री.भोसले यांचे भेट घेणे कामी रवाना केले व पोलीस स्टेशन सातारा येथे सापळा आयोजीत करुन थांबले. त्यावेळी पोलीस हवालदार श्री. भोसले यांनी आज दिनांक 29/02/2020 रोजी पोलीस स्टेशन सातारा औरंगाबाद शहर च्या समोरील हटेल विजय मध्ये लाचेचे चार हजार रुपये हे 14.05 वाजता माझ्याकडे झालेल्या मागणीप्रामणे पंच क्र.01 श्री.मतसागर यांचेकडुन पंचासमक्ष स्विकारले असता त्यांना सापळा पथकातील अधिकारी यांनी लाचेच्या रकमेसह पकडले. त्यावेळी सापळा पथकातील अधिका-यानी पोलीस हवालदार श्री.भोसले यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री.सुभाष छगनराव भोसले,वय:55वर्ष, व्यवसाय- नोकरी सहा.पोलीस उप निरीक्षक, पोलीस स्टेशन सातारा औरंगाबाद शहर रा: प्लट क्र.14, मयुरपार्करोड, हर्सुल परीसर, पाटील दवाखान्याच्या पाठीमागे,औरंगाबाद असे सांगितले. पोलीस हवालदार श्री. भोसले यांचे पन्टच्या समोरील बाजुच्या डाव्या खिशातुन लाचेची 4,000/-रु. रक्कम हस्तगत करण्यात आली असून तिचे क्रमांक व वर्णन मी हजर केलेल्या नोटांशी तंतोतंत जूळून आले आहे. त्यानंतर घटनास्थळी केलेल्या कार्यवाही मध्ये अ.व्हा. दिव्याचा प्रकाशझोत सहा.पोलीस उप निरीक्षक श्री. भोसले यांचे दोन्ही हातावर व अंगातील कपड्यावर टाकुन निरीक्षण केले असता पोलीस हवालदार श्री.भोसले यांचे डाव्या हाताच्या पाचही बोटाचे पेऱ्यावर तसेच अंगातील पन्टच्या समोरील डाव्या बाजुचे खिशाचे तोंडावर व आत मध्ये ठिक-ठिकाणी अ. पा. ची हिरवट चकाकी आम्हा पंचांना दिसुन आली. अशा प्रकारे श्री.सुभाष छगनराव भोसले,वय:55वर्ष, व्यवसाय- नोकरी सहा.पोलीस उप निरीक्षक, पोलीस स्टेशन सातारा औरंगाबाद शहर रा: प्लट क्र.14, मयुरपार्करोड, हर्सुल परीसर, पाटील दवाखान्याच्या पाठीमागे,औरंगाबाद. यांनी माझ्याकडे मी व माझा मित्र रवि पगारे विरुद्ध पोलीस स्टेशन सातारा येथे दाखल गुन्हयात कोर्टात हजर न करता पोलीस स्टेशनलाच जामीन देवुन जप्त केलेले मोबाईल परत देण्यासाठी चार हजार रुपये लाचेची मागणी करुन मागणी प्रमाणे लाचेची रक्कम पंच क्र.01 श्री. मतसागर यांचेकरवी आज दिनांक 29/02/2020 रोजी 14.05 वा. पोलीस स्टेशन सातारा औरंगाबाद शहर चे समोरील हटेल विजय मध्ये स्वीकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. हि फिर्याद दिली गु. र. नं. 55/2020 कलम 7 भ्रष्टाचार प्रतीबंध अधिनीयम 1988 ( संशोधन 2018)
फिर्यादी-कैलास संताराम मगर, वय-29 वर्षे, व्यवसाय- खाजगी चालक, रा: केकत जळगाव, ता.पैठण जि. औरंगाबाद मो.7720930835.
आरोपी- श्री.सुभाष छगनराव भोसले,वय:55वर्ष, व्यवसाय- नोकरी सहा.पोलीस उप निरीक्षक, पोलीस स्टेशन सातारा औरंगाबाद शहर रा: प्लट क्र.14, मयुरपार्करोड, हर्सुल परीसर, पाटील दवाखान्याच्या पाठीमागे,औरंगाबादगु. घ. ता. वेळ व ठिकाण- दिनांक 29/02/2020 रोजी 14.05 वा. हटेल विजय पोलीस स्टेशन सातारा समोर औरंगाबाद शहर खुलासा- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी फिर्यादी व फिर्यादीचा मित्र रवि पगारे विरुद्ध पोलीस स्टेशन सातारा येथे दाखल गुन्हयात कोर्टात हजर न करता पोलीस स्टेशनलाच जामीन देवुन जप्त केलेले मोबाईल परत देण्यासाठी चार हजार रुपये लाचेची मागणी करुन मागणी प्रमाणे लाचेची रक्कम पंच क्र.01 श्री. मतसागर यांचेकरवी आज दिनांक 29/02/2020 रोजी 14.05 वा. पोलीस स्टेशन सातारा औरंगाबाद शहर चे समोरील हटेल विजय मध्ये स्वीकारली वगैरे तक्रारदार यांनी लाचलुतपत प्रतिबंध विभाग औरंगाबाद येथे दिलेल्या तक्रारीवरुन ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद येथिल पोलीस उपअधिक्षक श्री मारोती पंडीत यांचे आजचे गुन्हा दाखल करण्याचे पत्रान्वये मा. पो. नि.सो. यांच्या आदेशाने DOअधिकारी पोउपनि एस.ए. शिरसाठ यांनी गुन्हा दाखल करुन पुढील तपासकामी पोलीस उपअधिक्षक , श्री. मारुती पंडीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद यांना दिला.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Vitthal Subhashrao Pote(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

H.S. [signature]

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

[signature]

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Vitthal Subhashrao Pote

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI

ड्युटी औफीसर
पोलीस स्टेशन सातारा
औरंगाबाद (शहर)